# सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उपक्रम (संक्षिप्त)

## शिक्षक

प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील ४० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक
प्राथमिक शाळेत किमान दोन शिक्षक

## शाळा/पर्यायी शाळेची सोय

प्रत्येक वस्तीपासून एक किलोमीटरच्या परिसरात
राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे नवीन शाळा किंवा शिक्षणाची सोय नसलेल्या वस्त्यांमध्ये शिक्षण हमीच्या धर्तीवर शाळा

## मोफत पाठ्यपुस्तके

प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरील सर्व मुली आणि अनुसुचित जाती/जमाती अंतर्गत येणारी सर्व मुले.
कमाल मर्यादा प्रत्येक मुलामागे रू १५०/-

## शालेय इमारत दुरूस्ती व देखभाल

फक्त शालेय व्यवस्थापन समिती ग्रामशिक्षण समिती मार्फत
शालेय समितीद्वारा प्रस्तावित बाबीवर एक वर्षास रू ५०००/- मर्यादेपर्यंत
समाजाची आर्थिक मदत/हिस्सा आवश्यक

## प्राथमिक शाळेत अध्ययन अध्यापन साधन

अध्ययन अध्यापन साधने रू १००००/- प्रतिशाळा या दराने तरतुद.
स्थानिक संदर्भ आणि गरजेनुसार अध्ययन अध्यापन साधने.
अध्ययन अध्यापन साधनांची निवड व खरेदी प्रक्रियेत शिक्षक आणि पालकांचा सहभाग.
खरेदीची सर्वोत्तम पद्धती ठरविण्यासाठी ग्रामशिक्षण समिती/शालेय समिती ही सक्षम समिती.

## उच्च प्राथमिक शाळेत अध्ययन अध्यापन साधन

आतापर्यंत विविध योजनांमध्ये समाविष्ट न झालेल्या शाळेसाठी रू ५००००/- प्रति शाळा या दराने तरतुद
शिक्षक व शालेय समिती यांनी निश्चित केल्याप्रमाणे स्थानिक गरजानुसार
शिक्षकांच्या सल्ल्यानुसार सर्वोत्तम पद्धतीची खरेदी होण्यासाठी शालेय समितीने निर्णय घ्यावा.
फायद्याची बाब लक्षात घेता शालेय समिती जिल्हास्तरीय खरेदीबाबत शिफारस करू शकेल.

## शाळा अनुदान

प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील नादुरूस्त साधनांच्या जागी नवीन उपकरण खरेदीसाठी रू २०००/- प्रती वर्षी.
उपयोगितेत पारदर्शकता
ग्रामिशिक्षण समिती/ शाळा व्यवस्थापन समितीने खर्च करावा.

## शिक्षक अनुदान

सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांसाठी प्रत्येक वर्षी रू ५००/-

उपयोगितेत पारदर्शकता

## शिक्षक प्रशिक्षण




सर्व शिक्षकांसाठी प्रत्येक वर्षी २० दिवस सेवांतर्गत प्रशिक्षणाची तरतुद, अप्रशिक्षित शिक्षकांसाठी ६० दिवसाचे उद्बोधन वर्ग व नवनियुक्त प्रशिक्षित शिक्षकांसाठी ३० दिवसाचे

उद्बोधन वर्ग प्रत्येक दिवशी रू ७०/- प्रमाणे.

अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रमात दरडोई खर्च कमी होऊ शकेल.

यामध्ये सर्व प्रशिक्षण खर्च अंतर्भूत आहे.

मूल्यमापनाच्या (Apprisal) वेळी प्रभावी प्रशिक्षणासाठी क्षमतांचा अभ्यास हा कार्यक्रमाची व्याप्ती निश्चित करेल.

विद्यमान शिक्षक प्रशिक्षण योजनेस राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद/जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची मदत.

## लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण

गावतील कमाल ८ व्यक्तींसाठी (महिलांना प्राधान्य) वर्षातुन दोन दिवसासाठी.

खर्च मर्यादा रू ३०/- प्रतिदिन.

## व्यवस्थापन खर्च

जिल्हा आराखडा अंदाजपत्रकातील व्यवस्थापन खर्चाची तरतुद ६ टक्केपेक्षा अधिक होऊ नये.

यात कार्यालयीन खर्च,तज्ज्ञांचे मानधन, इंधन खर्च याचा समावेश राहील.

व्यवस्थापन माहिती प्रणाली, समाजामार्फत नियोजन प्रक्रिया, बांधकाम, जेंडर इ विषयातील तज्ज्ञांना प्राधान्य.

राज्य/ जिल्हा / समुह पातळीवर प्रभावी टिम विकसित करण्यासाठी व्यवस्थापन खर्चासाठीची तरतुद वापरावी.

परिपूर्ण नियोजनासाठी प्रकल्प पूर्व टप्प्यातच गटसाधन केंद्र/ समुहसाधन केंद्राकरीता योग्य त्या साधन व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करावी.

## गटसाधन केंद्र / समुहसाधन केंद्र

गटसाधन केंद्र/समुहसाधन केंद्र शक्यतो शालेय प्रांगणात असावेत.

गरजेनुसार गटसाधन केंद्र इमारत बांधकामासाठी रू ६ लाख खर्च मर्यादा.

गरजेनुसार समुहसाधन केंद्र इमारत बांधकामासाठी रू २ लाख.

आवश्यकतेनुसार समुह साधन केंद्रचा वापर जादा वर्गखोली म्हणून होईल.

कोणत्याही वर्षात गटसाधन केंद्र आणि समुहसाधन केंद्र बांधकामाचा एकुण खर्च कोणत्ाही जिल्ह्यात एकूण प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के पेक्षा अधिक असणार नाही.

१०० पेक्षा अधिक शाळा असणा-या गटासाठी २० पर्यंत शिक्षक आणि लहान गटासाठी १० शिक्षक गटसाधन केंद्रात/ समुहसाधन केंद्रात नियुक्त करता येतील.

फर्निचर इ. साठी गटसाधन केंद्रास रू १ लाख दराने आणि समूहसाधन केंद्रास रू १००००/- दराने तरतुद.

प्रतिवर्षी आकस्मिक निधी - गटसाधन केंद्रास रू १२५००/- समुहसाधन केंदास रू २५००/-

योग्य निवड प्रक्रियेतुन कर्मचा-याचा शोध.